

# क्विक हिल फाऊंडेशनतर्फे संवाद सत्र

पुणे : क्विक हिल फाऊंडेशनतर्फे 'शाळांगण' डॉ. वसंतदादा पाटील हायस्कूल येथे नुकतेच संवाद सत्राचे आयोजन केले होते. या उपक्रमांतर्गत 'लाइफ स्किल ट्रेनिंग' कार्यक्रमांतर्गत क्विक हिलने पुण्यातील २७ महानगरपालिका शाळांमध्ये संवाद सत्र घेतले. या कार्यक्रमाला पुणे महानगर पालिकेचे शिक्षण अधिकारी आणि क्विक हिल टेक्नॉलॉजीस लिमिटेडचे एमडी आणि सीईओ कैलास काटकर यांची विशेष उपस्थित होती. या सत्रात इयत्ता ८ वी, ९ वी आणि १०वीच्या विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाऊंडेशन आणि पंख फाऊंडेशनच्या 'शाळांगण'च्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या मार्गदर्शन सत्रात आलेल्या अनुभवांचे कथन केले.